**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

www.prabhutarun.org

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

**वर्ष ८९ वे) प्रभुतरुण मुंबई, गुरुवार, ता. १६ माहे ऑगस्ट, सन २०१२ (अंक ९९५**

*संपादकीय*

# चतुराई

—सुहासिनी कीर्तिकर

परवा परवा मी एक व्यंगचित्र पाहिलं. सध्याच्या पाण्याच्या दुष्काळात एक तुंदिलतनु मंत्रीमहाशय आपल्या डोक्यावरील टोपीला जागून म्हणताहेत, ''आऽऽरं मी लाथ मारीन तिथं पानी काढीन. पन इरुध पक्षानं मला बोलवाया पाहिजेल ना!''म्हणजे बघा! इथे पुरेसा पाऊस नाही. अगदी अडीच महिन्यांपुरते पाणी तलावातून साठलेलं आहे. पण मंत्रीमहाशयांची 'पाणीदार' वचनं भलतंच राजकारणाचं पाणी दाखवतात. फक्त विरुद्ध पक्षाच्या विरुद्ध आपले पंख फडफडवले की दाखवलं यांनी 'पाणी'! दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करायचा स्वत: हेलिकॉप्टरने. त्यासाठी त्या भागात हेलिपॅड उभारायचे प्रचंड पैसे ओतून. बरं! हा पैसा कुठला? तर सरकारचा. म्हणजे त्यांच्याच 'मायबाप' सरकारचा. किती उधळला तरी काय बिघडतं? वेळप्रसंगी अशा प्रकारची मुक्ताफळं उधळली की बाऽऽस. फारच अंगावर बेतलं, चौकशी-आयोगबियोग नेमले तरी 'मी लाच घेतली नाही, दिली नाही' म्हणायला यांचे तोंड मोकळे. 'सर्वाधर्मसमभावही' ती ठेवतेच. (सर्व + अधर्म = सर्वाधर्म). मग आपल्या लुटीला गोंडस नाव ठेवण्याची चुरसच. 'म्हाडा'चे गरीबांसाठी असलेले गाळे हे 'गरीबबापुडे'(!) मंत्री फक्त एकदोन लाखांना घेणार. वर 'गरिबी हटाओ'चे नारे देणार. काय करता? 'आपुल्यामध्ये विश्व पाहुनि पूजितसे विश्वाला' अशी दूरदृष्टी असतेना यांची? मग कुठल्याशा शेजारी राज्यात फक्त काही (?) कोटी रुपये खर्च करून 'पर्जन्ययज्ञ' करायला नको का? शेतकरी भले उजाड शेतातील एखाद्या झाडाला लोंबकळत 'मोक्ष' प्राप्त करोत; यांचा 'मोक्ष'प्राप्तीचा मार्ग वेगळाच. अन् सदैव खुला.

बरं...यांची नीतिअनीतिची कल्पनाही फारच खुली. मग आपल्या देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा भीषण प्रश्न सोडविण्यासाठी सर्व संकटकाळी कृष्ण धावून येतो तसे हे अत्यंत नीतिमान-रीतीमान शिस्तीने परदेशदौरे करतात. 'माझ्या काळात मी परदेश दौरा फक्त तेरा वेळा केला' असेही त्यांचे 'तीनतेरा' करणारे समर्थन असते. अरे! देशात महागाई वाढली. भाज्यांचे भाव कडाडले. साधा श्रावणातला शिराळा साठ रुपये किलोने मिळतो. पालेभाजीची जुडी दहा, पंधरा रुपयांना एक मिळते. पेट्रोल वाढले, गॅस वाढला. रिक्क्षा, टॅक्सी, बसचे प्रवासदर वाढले. आणखी काय काय वाढले! म्हणजे 'रेव्ह' पार्ट्या वाढल्या, दारुबाज वाढले वगैरे वगैरे. जाऊ द्या झाले! शिक्षणासाठी तर साधा प्रवेश घेताना काही लाख, काही कोटी वाढले. असं सगळं सगळं 'कोट्यानुकोटी' वाढत असताना बिच्चाऱ्या मंत्र्यांचा मासिक भत्ता आणि नंतरचे पेन्शन नको वाढायला? गरीबांच्या या देशात एकाच शहरात त्यांची तीन तीन घरे. खेड्यांच्या या देशात त्यांची चार चार 'फार्म हाऊसेस'! आर्थिक विकसनशील, प्रगत अशा या देशात यांचे अनेक उद्योग. म्हणजे मेडिकल कॉलेजेस्, इंजिनीयरिंग कॉलेजेस यांचीच. 'आभाळाचा मुका' घेणाऱ्या इमारतींचे बिल्डर्स हेच. साखर कारखाने गुळाला मुंगळा चिकटावा

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

# मातृदेवो भव!

मिनाक्षी जयकर

'नेमेचि येतो मग पावसाळा...' आणि त्या पावसाबरोबरच नवीन गणवेष, नवीन दप्तर घेऊन शाळेच्या नवीन वर्षाची सुरुवात. यंदा नेमेचि येणारा पाऊस जरी नसला तरी शाळेचं नवीन वर्ष मात्र नेमाने सुरू झालं. आणि त्याबरोबर ओघाने येणाऱ्या परीक्षा, असेसमेंट, असाईनमेंट, प्रोजेक्टस्सुद्धा जोरात सुरू झाली. मुलांच्या असाईनमेंटस् किंवा त्यांची प्रोजेक्टस् म्हणजे आई-बाबांचाच अभ्यास असतो. त्यांच्या कल्पनाशक्तीची कसोटी असते. स्वत:चा नोकरी-धंदा सांभाळून दिलेल्या विषयावरची माहिती गोळा करायची, ती आपल्या मुलाच्या पातळीनुसार एडिट करायची, त्या अनुषंगाने चित्रे गोळा करायची, प्रोजेक्टचे मुखपृष्ठ समजून घ्यायचे. अशी सगळी जय्यत पूर्वतयारी करून ते प्रोजेक्ट ठरलेल्या दिवशी मुलाकडे सुपूर्द करायचे की तो शाळेत जाऊन ते जसंच्या तसं कॉपी करणार. एवढं सगळं होत नाही तोच पुढच्या प्रोजेक्टची तयारी सुरू! त्या दरम्यान शाळेच्या इतर परीक्षा, असाईमेंट सुरूच असतात. त्याचाही अभ्यास मुलाकडून करवून घ्यायचा. हे सगळं करण्याकरता, सगळ्यांच्या वेळा सांभाळण्याकरता आईला मात्र तारेवरची कसरत करावी लागते. ही वेळेची गोधडी विणता-विणता कधीतरी त्याला ठिगळंही लावावी लागतात. पण म्हणून काही त्या गोधडीची ऊब कमी होत नाही. असं म्हणतात की प्रत्येक मुलाच्या वेळेचं बाळंतपण हे वेगळं असतं. प्रत्येकाचं शास्त्र वेगळं असतं. प्रत्येकवेळी तो एक नवीन अनुभव असतो. जसं प्रत्येकाचं बाळंतपण वेगळं तसं प्रत्येक मुलाला वाढवणंही वेगळं असतं. एकाच्या बाबतीत एखादी गोष्ट लागू झाली म्हणून दुसऱ्याच्या बाबतीत तीच गोष्ट तशीच करता येईल असे नाही; किंबहुना ती तशीच करता येत नाही. मूल कितीही लहान असलं, तरी प्रत्येक वेळी कळत-नकळत ते तुम्हाला जाणीव करून देत असतं की मीही एक स्वतंत्र व्यक्ती आहे, मलाही एक स्वत:चं व्यक्तिमत्व आहे. म्हणूनच म्हणतात ना, 'एका हाताची पाचही बोटं जशी सारखी नसतात तशी एकाच आईची मुलंही सारखी नसतात.' त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयी, आवडी-निवडी भिन्न असतात. आईला रोज सकाळी उठून दोन मुलांकरता दोन वेगळे-वेगळे डबे करावे लागतात, कारण डब्यामध्ये एकाला एक हवे असते; तर दुसऱ्याला दुसरेच काही. दोघांच्या वागण्याच्या, अभ्यासाच्या तऱ्हा भिन्न. या सगळ्या भिन्नतेमुळे त्यांना वाढविण्याची पद्धती निरनिराळी होते. मुलांना वाढवताना पालकही नवीन गोष्टी शिकत असतात. मुलांना चांगल्या सवयी लावण्याकरता पालकांना त्याआधी स्वत:च्या अंगी बाणवाव्या लागतात. 'आधी केले, मग सांगितले' या उक्तीप्रमाणे पालकांना आपल्या सवयी बदलाव्या लागतात अन्यथा मुलांना जाब द्यावा लागतो. हल्ली मुलं वाढवणे या विषयावरची अनेक पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. बऱ्याच जणांनी ती अनुसरण्याचा प्रयत्नही केला असेल. हे छापील ज्ञान रोजच्या व्यवहारात किती उपयुक्त आहे हा एक चर्चेचा विषय होऊ शकेल. असो.

आईची आपल्या मुलांशी वेगळी

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)
तसे यांनाच चिकटलेले. मग यांचा भत्ता नको का बरे वाढायला? देशाचा विकास करायचा तर असे व्हायलाच पाहिजे!

महागाईभत्ता वाढून काय कात होणार हो? मग स्वयंम् विकासाच्या अनेक वाटा आपोआप फुटतात. हे 'फुटवे' तयार करण्याचे कल्पक डोके त्या त्या टोपीखाली असतेच ना! फार पूर्वीपासून अतिशय हुशार लोकांची परंपरा भारतात आहे हो. नागरीकरण केले. शहरीकरण झाले. 'मुंबईचे शांघाय' ('शांघाय' नावाचा चित्रपट नव्हे!) करायचे . 'सेतू बांधा रे सागरी' म्हणत 'सीलिंक'अप करायचे. भल्या भल्या मोठ्या इमारती अतिरेक्यांना लपायला छान जागा म्हणून बांधायच्या. पोलिसांच्या पायांना पट्ट्या बांधता बांधता त्यांच्या डोळ्यांवरूनही पट्ट्या बांधायच्या. पाकिस्तान खेळात जिंकले समजा, तर हिरवे झेंडे फडकवायला माणसांना भडकवायचे. सगळी कशी मुक्त व्यवस्था! मुक्त अर्थव्यवस्था आहेच. त्यात हे मौक्तिक मुक्त राजकारण. अशा 'कारणां'तूनच मग पोट भरण्याचा मार्ग मोकळा होतो! एखादा 'अण्णा हजारे' उभा ठाकलाच विरोधात तर लगेच 'वाजवा यांचा बाजा रे!' म्हणत या टोप्या, ही ढेरपोटे युक्तिवाद करण्यात पटाईत. आता अण्णांनी स्वत:च बाजा वाजवला ते वेगळे! नवनवीन प्रकल्प, नवनवीन योजना, नवनवीन यंत्रणा, नवनवीन संकल्प... सगळे मार्ग शेवटी एकाच दिशेने जातात मग. ऑल रोडस् लीड टू रोम! आपले रोम रोम खडे करणारे हे आजचे चित्र.

तंदुरी भट्टीत एखाद्या तरुणीचे प्रेत जळले तरी यांना त्याचा राजकीय, सामाजिक, न्यायालयीन, नैतिक... कुठलाच मुलाहिजा नसतो. एखाद्या अतिप्रामाणिक अधिकाऱ्याची बदली करून बदला घेतला की झाले की हो सगळे काम. मंत्र्यांच्या मुलांनी असे जन्मत:च किती बरे पुण्य जोडलेले असते. खरोखरच पुण्यवान. परंपरेने, वांशिक वारसाहक्काने (?) सत्ता मिळते. घराण्याचे बाळकडू मिळते. मोठमोठ्या 'एमबीए'सारख्या पदव्या आपोआप खिशात येऊन पडतात. हॉटेलमध्ये चंगळ करता येते. भर वेगात गाडी हाकून भारताची प्रचंड लोकसंख्या कमी करता येते! एखादी 'युवा' चळवळ जन्मजात नेतृत्व असल्याने यांच्याच मंत्राने चालते. हां! छंद तर किती किती किती जोपासता येतात. फक्त एकच योग कुंडलीत असावयास हवा. मंत्र्याच्या पोटी जन्म घ्यायचा. (बरे 'पोट' मोठेच यांचे!) नाहीच जमले तर मंत्र्याच्या कुळात जन्म घ्यायचा. म्हणजे काका, मामा, मावशी, आत्या कुणीतरी नातलग असलेच पाहिजे. तेही नाही जमलं तर मंत्र्याच्या घरात 'संबंधी' म्हणून घुसायचे. म्हणजे सासरा, सून, जावई वगैरे नात्याने. एवढे पुण्य साठवलेत की मग या महान देशात भले गरिबी असो, महागाई असो,स्पर्धा असो, प्रचंड लोकसंख्या असो... 'आवाज कुणाचा?'... असा आवाज टाकला की आपल्याला हवे ते उत्तर द्यायला 'जन्ता' असतेच.

त्या जनतेशी चतुर युक्तिवाद करता येतो. वाद घालता येतो. कारण आपला देश एक छान लोकशाही आहे!

पण हो! कधी कधी ही जनताही 'शहाणी' होते बरंका. ही शहाणी जनता यांच्या भूलथापांना फसत नाही. त्यांच्या योजनांना दाद देत नाही. त्यांच्या 'पापाचे घडे' त्यांच्या पायावर न ओतता त्यांच्या डोक्यावर ओतते. म्हणूनच ना; आपण या देशाचे पुण्यवान नागरीक ठरतो. अशा 'शहाण्या' जनतेच्या 'चतुर' युक्तिवादावर आधारित एक व्यंग-भाष्य करणारी रामदास फुटाणेंची कविता इथे आठवते बघा. कोणती म्हणता? नाही आठवत?

ही काय वीजटंचाईवर असलेली कविता. कवितेचे नाव आहे-

**वीज वीज माझ्या बाळा...**

शासनाने गेल्या अनेक वर्षात वीज निर्माण केली नाही.
परंतु एक जाहिरात तयार केली...
'विजेची बचत हीच विजेची निर्मिती'
जाहिरातीवर करोडो रुपये खर्च केले.
एकदा वीजमंत्र्याची गाडी हायवेने जात होती
प्रसिद्धी नीट चालू आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी मंत्र्यानी ड्रायव्हरला गाडी खेड्याकडे वळविण्यास सांगितले.
वळसे घेत, वळसे घेत (मंडळी इथे 'वळसे' वाढवा उच्चारातले. म्हणजे मग वीजमंत्री वळसेपाटील आठवतील. फुटाणे कविता वाचताना असेच करतात अन् ऐकणारा हास्यकल्लोळात बुडून जातो. तर कविता पुढे चालू बरं का.)
वळसे घेत, वळसे घेत वीजमंत्र्यांची गाडी एका खेड्यात आली.
वेशीबाहेरच एक मोठे होर्डिंग लागले होते-
'विजेची बचत हीच विजेची निर्मिती'
जाहिरात पाहून मंत्रीमहोदयांना आनंद झाला.
मंत्र्यांच्या गाड्या पाहून गाव गोळा झाले.
वीजमंत्र्यांनी गावकऱ्यांना विचारले-
'बोर्ड वाचला का?'
गावकरी- नाही बुवा. काय लिहिले आहे त्यावर?
मंत्री- तुम्हाला वाचता येत नाही?
गावकरी- नाही.
मंत्री- गावात शाळा नाही का?
गावकरी- नाही.
मंत्री- अहो असं काय करता? जग कुठं चाललंय...?
गावकरी- कुठं चाललंय?
मंत्री- अहो तसं नाही हो. गावात शाळा काढा.
गावकरी- कशाला?
मंत्री- मुलं शाळेत जातील.
गावकरी- मग काय होईल?
मंत्री- अहो, मुलं शाळेत जातील. त्यांच्या ज्ञानात वाढ होईल.
गावकरी- नको नको. ज्ञानात वाढ नको. अहो अडाणीच बरे आहेत. शेतात कामाला तरी येतात.
मंत्री- अहो, असं करू नका. शाळा काढा. त्यांना शिकवा. त्यांच्या ज्ञानात वाढ होईल.
गावकरी चिडले आणि म्हणाले, 'मंत्री महोदय, आमच्या गावाने ठरवलंय, शाळा काढायची नाही. शिकायचं नाही.ज्ञानात वाढ अजिबात करायची नाही. कारण ज्ञानाची बचत हीच ज्ञानाची निर्मिती.'

काय मंडळी! 'विजेची बचत हीच विजेची निर्मिती' तर मग ज्ञानाची बचत हीच ज्ञानाची निर्मिती (!) का नाही? आहे की नाही 'चतुर' जनता? म्हणजे आपणच हो!

तर 'चतुरकी जान' असे आपण सध्याच्या परिस्थितीला चतुराईने तोंड देऊ या.

(पान १ कॉलम ४ वरून)
जवळीक असते. त्यांची नस न् नस आई ओळखून असते. पण हे काही अचानक होत नाही. त्यासाठी आईलाही सतत नवीन गोष्टी शिकाव्या लागतात, मुलांना त्यांच्या कलाने वाढवता-वाढवता आईच्या अनुभवाचे भांडारही समृद्ध होत असते. प्रत्येकवेळी हे अनुभव सुखावह असतीलच असे नाही. पण आई मात्र न थकता, न कंटाळता ते अनुभव जगत असते. ते करताना आपल्या मुलांचं जीवन अधिक समृद्ध कसं होईल याची काळजी वाहते.

'ऐशी कळवळ्याची जाती
लाभावीण करी प्रीती'

असं बाईविषयी तुकाराम महाराजांनी लिहून ठेवले आहे. पण ते आईला जास्त लागू होते. मुलाला जरा दुखलं-खुपलं तरी पहिली वेदना आईला होणार आणि मुलाच्या तोंडून प्रथम आईच्या नावाने आरोळी उठणार. मुलाला कधी काय हवे याची आईला बरोबर कल्पना असते. मग ते पूर्ण करण्याकरता ती न थकता प्रयत्न करते. अभ्यास म्हणजे रोज करायची गोष्ट. काही गोष्टी आपण रोजच करत असतो. अगदी उदाहरणच द्यायचं झालं तर आपलं शिक्षण पूर्ण झाल्यावरही आईला मुलांच्या जोडीने रोज अभ्यास करावा लागतो, कधी शाळेचा तर कधी प्रोजेक्टच्या विषयाचा. असा सतत अभ्यास करणाऱ्या आईला मातृदिनाच्या निमित्ताने त्रिवार वंदन!

*

## स्पृहणीय

❁ पाठारे प्रभु महिला समाजाचा या वर्षीचा आर्थिक अहवाल आणि वार्षिक नोंद गतवर्षीप्रमाणेच सभासदांना वेळेत पोहोचला. संस्था म्हटली की हा सोपस्कार अटळ असतो. तो पाळून महिला समाजाने आपली शतकाकडे यशस्वी घोडदौड नेटकेपणाने चालू ठेवली आहे. पाठारे प्रभुंच्या खास रांगोळ्यांनी रेखलेले मुखपृष्ठ ही या अहवालाची खासियत. अभिनंदन.

❁ दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे पाठारे प्रभु चॅरिटीज या संस्थेने जुलै २०१२ मध्ये 'न्यूज लेटर' दिमाखात प्रसिद्ध केले. ज्ञातीतील अभिनंदनीय अशा विशेष घटनांची छायाचित्रांसह नोंद आणि नुकत्याच झालेल्या श्री. अजित विजयकर यांच्या सत्कार समारंभाची उजळणी यांनी हा अंक उजळून निघाला आहे. चॅरिटीजच्या सर्व देवळांमधील दैवतमूर्तींचे मुखपृष्ठावरील अधिष्ठान आकर्षक आहे. अभिनंदन.

## कृपया नोंद घ्यावी

THE PATHARE PRABHU CHARITIES
EDUCATIONAL MERIT PRIZE AWARDS 2012
**LAST DATE**
**15TH SEPTEMBER 2012**
TO SUBMIT THE EXAMINATION RESULTS
IN TRUST OFFICE, THAKURDWAR

**UDAY S. MANKAR**
CHAIRMAN TRUSTEE

1st August 2012

## शब्द

शब्द एक मायेचा, ज्यात दिसे ममतेची माता
शब्द एक वत्सलतेचा, पाठीवरी हात फिरे पित्याचा।
शब्द एक सुहृदाचा, प्रकट करी बन्धुभाव खासा
शब्द एक पतिप्रेमाचा, जो विसरवी साऱ्या दु:खाला।
या साऱ्या शब्दांपासून, जो वंचित राहिला
तो आयुष्यभर राहिला भुकेला

**- यशोदिनी यदुवीर राणे**

लेखांक-७

# कालची मुंबई-आजची मुंबई

— विश्वास नारायण अजिंक्य

१९व्या शतकात इंग्रजांनी नवीन शिक्षणपद्धती अमलात आणली, तेव्हा मुलांच्या शिक्षणाविषयी जनतेचा तितकासा विरोध नव्हता; पण मुलींच्या शिक्षणाला लोकांची मुळीच अनुकूलता नव्हती. मुलींचे शिक्षण म्हणजे समाजावर ओढवणारे गंडांतर अशा समजुतीने त्या शिक्षणाला पोक्त जनता विरोध करीत होती. मुलींना शाळेत नेणे व घरी आणून पोहोचवणे ही कामे शिक्षकांना करावी लागत. नंतर उच्च शिक्षण संपादून सरकारी नोकरी किंवा डॉक्टर, वकील वगैरे व्यवसायांच्या जोरावर लोकांत मान्यतेस चढलेल्या अनेक व्यक्तींनी स्त्री शिक्षणाचा उघड सक्रीय पुरस्कार आरंभल्यामुळे विरोधाची धार बोथट होत गेली. लोकांच्या विरोधाला न जुमानता ज्याप्रमाणे मुलींच्या शाळा निघाल्या त्याचप्रमाणे सरकारी विरोधाची भीती न बाळगता देशी वृत्तपत्रे जन्मास आली. मुंबईत निघालेले देशी भाषेतील गुजरातीतील ‘मुंबई समाचार’ हे पहिले वृत्तपत्र. ते जुलै, १८२२ मध्ये काढण्यात आले. आधी ते साप्ताहिक होते. नंतर ते दैनिक झाले. सुरुवातीच्या काळामध्ये विनायक वासुदेव आगासकर व जनार्दन वासुदेव आगासकर हे ‘मुंबई समाचार’चे संपादक होते. तर मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र ‘दर्पण’ हे सर्वांनाच माहीत आहे, ते १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांच्या संपादकत्वाखाली सुरू झाले. वृत्तपत्रकाराजवळ पैशांचे पुरेसे पाठबळ लागते. या वर्तमानपत्राची आर्थिक बाजू भाऊ रसूलांचे बंधू रघुनाथ हरिश्चंद्र अजिंक्य आणि जनार्दन वासुदेव आगासकर हे दोघे सांभाळीत असत. ‘बॉम्बे टाइम्स’ १८३८ मध्ये निघाले. सुरुवातीस हेसुद्धा दैनिक नव्हते. आठवड्यातून दोनदा बुधवार आणि शनिवार या दिवशी ते प्रसिद्ध होत असे. १८५० मध्ये ते दैनिक झाले. नारायण दिनानाथ वेलकर हे त्यात भागीदार होते. या वर्तमानपत्राचे पहिले नाव बदलून १८६१ मध्ये ‘टाईम्स ऑफ इंडिया’ ठेवले गेले. १८१५ ते १८२७ मुंबईचा गव्हर्नर असलेला माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन हा ज्ञानाचा भक्त होता, पण वृत्तपत्रांचा शत्रू होता. वृत्तपत्रे न निघणे उत्तम व निघाल्यास त्यावर कडक निर्बंध असावेत असा त्याचा ठाम अभिप्राय होता. हाच एलफिन्स्टन १८२७ मध्ये स्वदेशी गेल्यावर त्याच्या स्मरणार्थ लोकांनी दोन-अडीच लाखांची रक्कम उभी करून त्याच्या नावाने शिक्षण संस्था अस्तित्वात आणली. प्रथम एलफिंस्टन इंस्टिट्यूट एवढेच तिचे नाव होते. पुढे एलफिंस्टन कॉलेज व एलफिंस्टन हायस्कूल अशा दोन संस्था निघाल्या.

१९व्या शतकाच्या मध्यास ‘नाटक’ हा प्रकार दक्षिण महाराष्ट्रातून मुंबईस आला. १८८० साली नाटकातील गद्य सवादाला संगीताची जोड देऊन अण्णासाहेब किर्लोस्करांनी नव्या रुपातील ‘संगीत नाटक’ रंगभूमीवर आणले व संगीत नाटकांची गोडी समाजातील रसिकांना लागली. पुढे ती कुशल, गुणी नटांनी वाढविली. बालगधर्वांनी आपल्या मालकीची गंधर्व नाटक मंडळी उभी करून तिची लोकप्रियता उच्च स्थानीच राखली. ‘शाहू नगरवासी’ तसेच ‘महाराष्ट्र नाटक मंडळ’ हे सुद्धा आपली गद्य नाट्यसेवा करीतच होते. तमाशा हा नाटकाचाच एक प्रकार. पठ्ठे बाबुराव या नावाचे एक गृहस्थ तमाशाच्या क्षेत्रात नाव गाजवून गेले. मुंबईला १९०८ पासून सिनेमाची ओळख आहे. सर्कशीप्रमाणे सिनेमाची यंत्रे घेऊन मोठाल्या शहरी सिनेमातील चित्रे दाखवून द्रव्य गाठीस मारावे व स्वदेशी जावे अशा रितीने सिनेमा कंपन्या प्रारंभी आपले काम करीत असत.

इंग्रजांच्या कारकिर्दीत मुंबईस येऊन आपल्या कर्तबगारीने प्रख्यातीस चढलेले अनेक पारशी मूळ नवसारीचे रहिवासी. पारशी समाजाचा उदयकाल इंग्रजांच्या कारकिर्दीत झाला. अनेक उल्लेखनीय पारशी कुटुंबानी मुबईच्या वैभवात आपल्या देणग्यांनी भर टाकली आहे.बहुतेक पारश्यांची नावे स्थळावरून, गुणांवरून, व्यवसायावरून अथवा कामाच्या स्वरूपावरून पडलेली आहेत. बाटल्या विकणारा म्हणून बाटलीवाला। दारू विकणारा दारूवाला, तारापूरचा राहणारा म्हणून तारापोरवाला, तर भिवंडीचा म्हणून भिवंडीवाला. मुंबईत इंग्रजांच्या राजवटीत पारश्यांनी चीनशी चाललेल्या व्यापारात पैसा कमावला. मुंबई शहराच्या व्यापार-व्यवहारामध्ये सामान्यत: अशी एकही बाजू सापडणार नाही की त्याबाजूच्या आघाडीवर पारशी नाहीत. जमशेटजी टाटा हेसुद्धा मूळचे नवसारीचेच. त्यांना एकदा प्रवासात एक युरोपियन मुशाफिर भेटला व एवढ्या मोठ्या मुंबई शहरात परदेशी पाहुण्यांना सुखाने राहता येईल असे एकही हॉटेल नसावे याचे आश्चर्य व्यक्त केले. जमशेटजींना त्याचे म्हणणे पटले व त्यांनी आपल्या मुबई शहरात कसलीही उणीव राहू नये यासाठी ‘ताजमहाल’ हे हॉटेल बांधून काढले. आज हे हॉटेल मुंबई शहराचे भूषण मानले जाते. हिंदुस्तानात मोटार आणणारे जमशेटजी हेच पहिले गृहस्थ.

इंग्रज जेथे जाईल तेथे आपले खेळ घेऊन जातो. मुंबईस त्याच्या राज्याचा जम बसल्यावर त्याचे फुटबॉल, क्रिकेट, टेनिस, हॉकी, बॅडमिंटन वगैरे खेळ मुंबईकरांनी आपलेसे केले. बैठ्या खेळात गंजिफा, बुद्धीबळ, सोंगट्या मागे पडून पत्ते घुसले. क्रिकेट या खेळाला पारशी समाजाने प्रथम १८४०च्या सुमारास आत्मसात केले. त्यानंतर कित्येक वर्षांनी हिंदूनी हा खेळ स्वीकारला. त्यानंतर काही वर्षांनी त्यात मुसलमान शिरले. मग दुरंगी, तिरंगी वगैरे खेळाचे सामने अस्तित्वात आले.

इंग्रजी राज्याच्या प्रारंभी इंग्रजी शिकलेल्या भारतीयांनी आपला पोशाख सोडला नव्हता. अव्वल इंग्रजीशाहीत पागोटे व अंगरखेवजा कोट कायम होता. पागोट्यावरून पगडी व पगडीनंतर टोपी असे स्थित्यंतर होऊ लागले. कालांतराने टोपीसुद्धा गायब झाली. चहा हे पेय मुंबईत फार उशीरा लोकप्रिय झाले.. १९व्या शतकाच्या अखेरीस मुंबईत अनेकांच्या घरात चहाचा शिरकाव झाला. तोपर्यंत कॉफी पिणे हे सुखवस्तु, सभ्यपणाचे लक्षण समजले जात असे.

१८५३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेचे पुनरुज्जीवन व्हायचे असल्याने इंग्रजांच्या विद्यादानाने जागृत झालेल्या हिंदी जनतेने कंपनीच्या कारभारातील अहितकारक दोष पार्लमेंटला कळविण्यासाठी संस्थांच्याद्वारा लोकमत संघटीत केले व पार्लमेंटकडे आपली कैफियत मांडली. त्यासाठी १८५२ मध्ये मुंबईला ‘बॉम्बे असोसिएशन’ या नावाची एक राजकीय संस्था निघाली होती. तिचा पुढाकार नाना शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी लाड, नारायण दिनानाथ वेलकर इत्यादींकडे होता. या संस्थेतर्फे गेलेली कैफियत फार खणखणीत भाषेत लिहिलेली होती. सुरुवातीस इंग्रजांच्या पुढाकाराची वृत्तपत्रे या संस्थेचे कौतुक करीत होती. परंतु सरकारवरील निर्भीड टीकेने थोड्याच अवकाशात ही वृत्तपत्रे बिथरून त्यांनी विरोधी टीका आरंभली. इंग्रजी वृत्तपत्रांच्या टीकेला न भिणे हे त्या काळातील दिव्यच होते. ही संस्था फार काळ जगली नाही. पण शिक्षण आणि जागृती देशाच्या सर्व भागात वाढल्याने प्रांतोप्रांती राजकारणाचा विचार करणारी पुष्कळच माणसे दिसू लागली.

१८८५ मध्ये मुंबईस आणखी एक अतिशय महत्त्वाची अशी राजकीय व अखिल भारतीय दर्जाची संस्था निघाली. तिचे नाव ‘इंडियन नॅशनल काँग्रेस’. या संस्थेचेसुद्धा सुरुवातीचे ध्येय राज्यनिष्ठापूर्वक ब्रिटीश राज्यातील प्रजेला जाचणारे दोष चव्हाट्यावर मांडून ते घालविण्याचा प्रयत्न करणे हे होते. संस्थेच्या बैठकी दरवर्षी डिसेंबर महिन्यात एखाद्या मोठया शहरी भरत. परंतु स्थापनेनंतर थोड्याच अवकाशात ब्रिटीश राज्यकर्त्यांची काँग्रेसबद्दलची उपेक्षावृत्ती बदलली. आणि सक्रीयविरोधाची पावले ते टाकू लागले. त्यामुळे काँग्रेसच्या गोटातील राज्यनिष्ठेचा क्षय होऊ लागला. प्रचंड विरोध असतानासुद्धा बंगालची फाळणी अमलात आणून इंग्रज राज्यकर्त्यांनी दडपशाहीचा पाया घातल्यामुळे हिंदी लोकांमध्ये जहाल व मवाळ असे दोन परस्परविरोधी तट पडले.पुढे महात्मा गांधी हिंदी राजकारणात आले व इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध स्वराज्य प्राप्तीसाठी अखंड लढा चालवून १९४७ मध्ये ते ध्येय साध्य केले. काँग्रेसची पहिली बैठक पुण्यास होणार होती. पण तेथे कॉलराची साथ पसरल्यामुळे ती मुंबईस गोकुळदास तेजपाल यांच्या गवळी तळ्यानजीक असलेल्या संस्कृत पाठशाळेच्या दिवाणखान्यात भरली. ज्या संस्थेने इंग्रज राज्यकर्त्यांशी सतत अविश्रांत झगडून देशाला स्वराज्य व स्वातंत्र्य मिळवून दिले तिचे सूतोवाच मुंबईस व्हावे हे या शहराचे भाग्य आहे.

*

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# YUVA MANCH
Together Towards Tomorrow

**Prabhu Tarun Website :** prabhutarun.org

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us, so that we can provide you with your new user IDs.

# GO GREEN!

Green is a primarily a health-related issue that blends into the other topics of sustainability, pollution control, and conservation.

The advantages of going for green energy.

First and foremost, it helps you to stop global warming. You don't harm Mother Earth. You reduce the burden of the state for infrastructure development in the energy sector even as you save considerably on power bills. It brings down the electric bills drastically and provides for uninterrupted power supply, you become self-sufficient energy wise.

Advantage of using the combination of Wind and Solar as against using either of them.

Being in tropical country like India, it is recommended that we have a hybrid combinational system. Besides, reliability of the system increases drastically as both forces act to generate energy and you are ensured of a steady supply during all the seasons. A significant improvement in output and performance is also observed. Besides, the size of the storage battery also reduces by a bit which brings down the cost. The user is also eligible for a subsidy of Rs.1 lakh per installed kilowatt on hybrid systems by the Ministry of New and Renewable Energy, Delhi.

Percentage of households that have gone for hybrid systems.

Hardly any. But the awareness is growing day by day. The percentage will definitely increase as days goes by and as power rates increase.

Despite its advantages, this technology needs to get wider acceptance.

There is not much awareness. The initial investment cost could also be an issue with some. Another fact is that people are afraid of the towering structure that they have seen are installed on the grounds. The wind mills are small and not big ones. What we are talking about systems that weigh hardly 400 kilograms. The people are not aware that the systems are installed on anti vibration pads so that the vibrations are not transferred to the super structure of the building.

Feasibility for housing societies.

This is the best thing to happen to housing societies. A project completed in Goregaon, Mumbai, on a 24 storeyed twin tower, and its residents are now not required to pay any electric bill for their common utilities. The break even period is under 4 years and therefore, they stand to enjoy free supply for next 20 years.

The cost structure of a typical project and the time frame that a society could get back its investment.

A typical 5kw hybrid would cost nearly Rs.16 lakh in which one would get a refund of Rs 5 lakh bringing down the investment to just Rs.11 lakh. If the society pays taxes it is also eligible for a further depreciation benefit to the tune of Rs 4.5 lakh, eventually bringing the system cost down to just Rs 6.5 lakh which would pay for itself in just 2.5years. One normally provides an inverter and a battery bank for residences. As one saves on the investment in the inverter & battery, one has to pay just 75% to 80% of the system cost for green energy generation.

The typical types of housing societies that one would recommend hybrid power.


Any society which is more than 8 to 9 floor high and does not have any buildings that are taller to the building in the near vicinity. Also large societies with more than 40 flats are ideal candidates. All societies near to the sea coast are best for such installation even if they are bungalows or smaller buildings. Societies having large or underground car parking are best recommended for utilizing such systems. Societies having large play areas or a large quantity of street lights are recommended to have green energy systems. If wind mill installation is not possible one can just opt for solar energy generation.

The common factors among housing societies that hinder widespread use of green energy.

(Cont. for next issue)

**-Narendra Virag Dhairyawan**
9821138102
{avcons_in@yahoo.com}

✳


वलय प्रतिष्ठान.

अंक हातात पडेल तेव्हा तुमच्याकडे फक्त १०-१५ दिवस राहिलेले असतील. लक्षात आहे ना! पाठारे प्रभु आयडॉल शोधाचे पहिले audition शनिवार दिनांक १ सप्टेंबर रोजी आपल्या खारच्या पाठारे प्रभु सोसायटी हॉल येथे दुपारी २ वाजल्या पासून होणार आहे. आपल्या गायक नातेवाईकास प्रोत्साहन द्या.

तुमच्यातच गायक दडला असेल तर त्यालाही प्रेरित करा, नोंदणी करा आणि भाग घ्या. तुम्ही १ सप्टेंबर पर्यंत नोंदणी करून भाग घेऊ शकता. आणि हो खास लोकाग्रहास्तव! उमेदवाराची वयोमर्यादा ही ३५ वरून ५५ पर्यंत नेत आहोत. तेव्हा त्वरा करा तुम्ही फॉर्म्स घेतले नसतील तर खालील व्यक्तींना संपर्क करा.

वांद्रे – ऐश्वर्या अजिंक्य 9819924826.
खार – पवन किर्तीकर 9769695901.
रजनी कोठारे 9869940184.
स्वाती राणे 9870782651.
9029679982.
अंधेरी – आशिष देसाई 9960553302
विरार – प्रांजली धुरंधर 9833843793.
मुलुंड – सौरभ प्रधान 9869008314.
ठाणे – प्रकाश राव. 98[illegible]1939002[illegible].
डोंबिवली – वीरधवल तळपदे

सारेगम फेम - अपूर्वा गज्जल यांच्या साथीने आपण शोध घेत आहोत "पाठारे प्रभु आयडॉल" चा..

## MAHABALESHWAR

***COME HERE TO EXPERIENCE NATURE AT ITS BEST WITH***
***JASMINE COTTAGE***





***THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS . IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST***
***ALL THE ROOMS HAVE SERENE ENVIRONMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUESTS CAN SIT AND ENJOY THE PLEASANT BEAUTY OF THE NATURE***

**FACILITIES:**
- Attached bath
- Hot & Cold Running water
- Television with Satellite Connection
- Car Parking
- Large open area for playing outdoor games

**Location:**

It is located near the market in Mahabaleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabaleshwar.

***For Booking Contact:***
***Velkars 9930172689 9220451465***

लेखांक ७

# चिमणीच्या दातांनी

## अगा हे घडलेची नाही!

-कल्पना सुभाष कोठारे

इये मराठीचिये नगरी घडलेली, ही एक सत्य विनोदी घटना आहे. एका सुप्रसिद्ध साहित्यसंस्थेने दोन दिवसीय साहित्य संमेलनाचे यजमानपद सांभाळले होते. नेहमीप्रमाणे उद्घाटन, स्वागत समारंभ, अध्यक्षीय भाषण, सकाळ,दुपारची चर्चासत्रे, संध्याकाळचे कवयित्री संमेलन, रात्रीचे नाटक वगैरे भरगच्च कार्यक्रम आखला गेला होता. समारोपाचे सूप कोणी वाजवायचे तेही ठरले होते. दीप प्रज्ज्वलन, पुष्पगुच्छ व्यवस्था, चहापान, भोजन आदी आवश्यक जबाबदाऱ्याही संस्थेच्या उत्साही कार्यकर्त्यांनी नीट वाटून घेतल्या होत्या. कोणत्याही कार्याची सुरुवात जशी गणेशपूजेने होते, तशी साहित्यसंमेलनाची सुरुवात नेहमी पुस्तक-प्रदर्शनांच्या उद्घाटनाने होत असते. एका प्रसिद्ध प्रकाशनसंस्थेने यासाठी प्रवेशद्वारालगतच पुस्तक-प्रदर्शन मांडून ठेवले होते.

लग्नप्रसंगी दारी वर येऊन उभा रहावा व वधुपक्षाला ओवाळणीचे तबकच सापडू नये तसे काहीसे झाले. मान्यवर निमंत्रित साहित्यिक व रसिक श्रोते संमेलनात सहभागी होण्यासाठी दारी आले. प्रमुख पाहुण्या व संमेलनाध्यक्ष यांचेही यावेळी आगमन झाले. आता स्वयंसेवक (किवा सेविका) कात्री असलेले तबक पुढे करतील व प्रमुख पाहुणे फीत कापून संमेलनाचे उद्घाटन करतील असे सर्वांना वाटले. अरेच्चा! पण हे काय? कात्री आणि फीत कुठे आहे? झाले होते असे की पुस्तकप्रदर्शनवाली प्रकाशनमंडळी धरून चालली की कात्री व फीत संमेलनाची संयोजक मंडळी आणतीलच! तर अनेक प्रदर्शनांचा अनुभव गाठीशी असणारी सुप्रसिद्ध प्रकाशनसंस्था स्वत:ची कात्री व फीत आणेलच- असे बहुधा साहित्य संस्थेच्या संयोजक सभासदांना वाटले असावे. या गोड गैरसमजावर अखेर एका कवीने युक्तीपर पांघरूण घातले.

कविराजांनी कवयित्री पत्नीच्या पर्समधील वीणकामातून लोकरीचा धागा काढून प्रवेशद्वाराशी बांधला. परंतु कात्री? परत बाका प्रसंग! 'असू दे!' म्हणत प्रमुख पाहुणे (तेही एक मान्यवर कविराजच) पुढे झाले. हलक्या हातांनी त्यांनी ती रेशीमगाठ-नव्हे! -लोकरगाठ सोडविली. टाळ्या वाजल्या. पुस्तकप्रदर्शन खुले झाले व संमेलनाची नांदी झाली. उद्घाटनानंतर पुढील दोन दिवस चाललेले संमेलन 'ऊबदार' सुरुवातीमुळे की काय छानच पिकले.

'खाल्ल्या मिठाला जागण्याच्या' अस्सल मराठी बाण्यामुळे की काय या सत्य विनोदी घटनेचा उल्लेख कोणत्याच वृत्तपत्राच्या वार्ताहराने केला नाही. साहित्य संस्थेचे व प्रकाशन-संस्थेचे नाव गुलदस्त्यात ठेवून मीही तेच केलेय नं!

*

## पिठोरी

दिवली घेउनशान्  
ववाळीन तुला  
औंदाच्या पोळ्याला  
तरी येरे मुला  
घास तुझ्या हातानं  
घेईन म्हणालं  
ढवळ्या न् पवळ्या  
लागलयत हंबरायला। औंदाच्या...  
पाऊसपाणी मोप झालयं  
वावरबी हिरवं झाल्यं  
वाटंकडं डोळं लावून  
बुढाबी बसलाय मेला।  
औंदाच्या...  
पुरण, वरण करीन  
जात्याला नवीन  
खुंटबी बशवीन  
दुधात साकर पडन्  
जवा हाळी देशिन्  
'मायवोऽ आलोगंऽ'  
कान लागलं ऐकायला।  
औंदाच्या...  
हिमालयाच्या वाटंला  
खायला भेटना तुला?  
किती गं बाय सुकला  
मढं बशविलं  
त्या अतिरेक्याचं मेल्या  
कित्ती दिस लढाई चाल्ली  
अक्कल येइना त्याला? औंदाच्या...  
वाट पाहून पाहून  
जीव ह्यो थकला  
सांगावा धाडलायं  
तुझ्या भयनीला  
'भाऊ येतो पिठोरीली  
म्हून धावत येशिला'। औंदाच्या...  
वयनी भेटवायची तिला  
औंदा बार उडवायचा गड्या  
औंदाच्या पोळ्याला तरी येरे मुला!

-कल्पना सुभाष कोठारे

संपर्क : २६१०४५५२

*

## सोशल समाजाची अभंगयात्रा

सालाबादप्रमाणे यंदाही सोशल समाजाची अभंगयात्रा शनिवार दिनांक ७ जुलै, २०१२ रोजी ठाकुरद्वारच्या व्यंकटेश मंदिरात संपन्न झाली. वारकरी जसे आपल्या पंढरीच्या वारीचे नेम चुकवीत नाहीत, तसेच सोशल समाजानेही हा अभंगयात्रेचा वसा गेली २९ वर्षे निष्ठेने जपला आहे. यावर्षी सोशल समाजाचे विश्वस्त श्री. मधुकर तळपदे आणि सोशल समाजाच्या अभंगयात्रेत व अन्य कार्यक्रमातही साथ करणारे श्री. अनंतकुमार कोठारे यांचे दु:खद निधन झाले. अभंगयात्रेला प्रारंभ करण्यापूर्वी या दोघांना श्रद्धांजली वाहिली गेली. उपाध्यक्ष स्वाती प्रवीण राणे आणि समाजाचे विश्वस्त श्री. माधव जयकर यांनी कै. मधुकर तळपदे व कै. अनंतकुमार कोठारे यांना आदरांजली वाहून अभंगयात्रेविषयीचे आपले मनोगत व्यक्त केले.

अभंगयात्रेचा प्रारंभ सौ. रॉनिका विजयकर यांनी गायिलेल्या 'सुखकारक, भवतारक, आश्वासक गणराया' या गणेशस्तवनाने झाला. त्यानंतर आपल्या ज्ञातीतील लहानथोर १९ कलाकारांनी आपली गानसेवा विठ्ठलचरणी रुजू केली. अभंगयात्रेचं सूत्रसंचालन श्रीमती स्वाती राणेंनी अतिशय रसाळ, सोप्या, भावपूर्ण भाषेत केले. समाजाचे चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर यांनी समाजाला आलेल्या देणग्यांचे वाचन केले. यातील उल्लेखनीय बाब म्हणजे समाजाच्या अभंगयात्रेत कैक वर्षे सक्रीय सहभागी होणाऱ्या कै. रसिक व्यवहारकर यांच्या ५व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री. यतीन रसिक व्यवहारकर यांनी समाजाला रु. २,५००/-ची देणगी दिली. श्रीमती क्षमा कोठारे यांनी करिष्मा कीर्तिकर, योगिता नवलकर, वीणा अजिंक्य, मधु धुरंधर यांच्या साथीने सादर केलेल्या 'धन्य झाले, अजि आनंदले त्रिभुवन' या मधुर व समर्पक भैरवीने अभंगयात्रेची सांगता झाली.

यावर्षी समाजाच्या अध्यक्षा श्रीमती प्रमिला तळपदे कार्यक्रमाला उपस्थित नव्हत्या. तरीसुद्धा 'शो मस्ट गो ऑन' या ब्रीदाला जागून प्रमिलाताईंनी उपस्थितांना त्यांच्यातर्फे कॉफी देण्याची व्यवस्था केली होती. पेढ्यांचा प्रसाद समाजाचे विश्वस्त श्री. अजित तळपदे यांच्यातर्फे होता. समाजाच्या उपाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी अभंगयात्रा संपन्न होण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल श्री. व सौ. प्रदीप राणे यांचे तसेच इतर संबंधितांचे आभार मानले. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्षा स्वाती राणे यांनी चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर यांच्या मदतीने व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली अभंगयात्रेचा कार्यक्रम सुविहितरीत्या व यशस्वीपणे पार पाडला.

या अभंगयात्रेला साथसंगत केली होती संवादिनीवर श्री. चंद्रकांत सुतार, श्री. शेषनाथ पावसकर व श्री. वसंत मोरे यांनी व तबल्याची साथ होती श्री. प्रदीप राणे व श्री. मदन नेने यांची. तालवाद्य श्री. मांद्रेकर यांचे होते. यातील सहभागी कलाकार:- आदिती विजयकर, कौमुदी राणे, तन्मयी विजयकर, वीणा अजिंक्य, रजनी कोठारे, सुरूपा राणे देववूखकर, योगिता नवलकर, अक्षदा तळपदे, सुबोध प्रधान, मधु धुरंधर, पूजा अजिंक्य, अमृता कोठारे, मिहिका नवलकर, रॉनिका विजयकर, क्षमा कोठारे, करिष्मा कीर्तिकर, विद्युत नायक, चिंतामणी कीर्तिकर आणि सीमा कीर्तिकर.

## सोशल समाजाची वर्षा सहल

रविवार दिनांक १५ जुलै २०१२ रोजी सोशल समाजाची वर्षा सहल अर्नाळा बीचजवळच्या नरापुरा बीचवर 'ग्रीन लँड' रिसॉर्ट येथे गेली होती. यावर्षी सहभागी झालेल्या सभासदांचा आकडा ७२ वर पोहोचल्याने दोन बसेस करून ही सहल आयोजित करण्यात आली. बसमध्ये सभासदांनी आणलेल्या चकले, बाकरवडी, चॉकलेटस्, बिस्किटे यासारख्या पदार्थांवर ताव मारीत मंडळी रिसॉर्टवर पोहोचली तेव्हा तेथे गरमागरम पोहे आणि ऑम्लेटब्रेडचा नाश्ता वाट पाहत होता. पोटोबा झाल्यावर मंडळींनी स्विमिंगपूलमध्ये मनसोक्त डुंबण्याचा आनंद लुटला. या सहलीतील सर्वात सिनियर मोस्ट श्री. शरद धुरंधर (वय वर्षे ८६) आणि ज्युनियर मोस्ट विवान आगासकर (वय वर्षे दीड) हेही जलक्रीडेमध्ये रमले होते. त्यानंतर विरारची खासियत 'चिकन बुजिंग'चा सर्वांनी आस्वाद घेतला. जवळच असलेल्या समुद्रकिनारी काहींनी फेरफटका मारला तर महिलांची गावरान भाज्यांची खरेदी करण्यासाठी झुंबड उडाली.

दुपारी २-२।। वाजता जेवणाची टेबले लागली आणि सर्वांनी सामिष. निरामिष भोजनाचा आस्वाद घेतला. यावर्षी सिनियर मंडळींबरोबरच तरुणाईचीही या सहलीत चांगलीच हजेरी होती. भोजनानंतर कुणालाही विश्रांती घेऊ न देता आयोजकांनी संगीत खुर्ची, पासिंग द पार्सल, हौझी अशा खेळांचे आयोजन केले आणि हां हां म्हणता संध्याकाळच्या चहाची वेळ झाली. चहा कॉफी बिस्किटे असा हलका नाश्ता घेतल्यावर परतीच्या प्रवासाचे वेध लागले. जेवणानंतर स्वीटडिश म्हणून सौ. नीता सेंजितकडून जिलेबी आणि सौ.

(पान ६ कॉलम ४वर)

## प्रभुतरुणास देणगी

❁ डॉ. सौ. सुरेखा आणि श्री. बन्सीधर सदाशिव धुरंधर यांजकडून रु.५०००/-

❁ डॉ. गजानन वामनराव विजयकर यांच्या दिनांक १७ जुलै २०१२ रोजी साजरा झालेल्या ८९व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ त्यांचे सुपुत्र डॉ. प्रदीप गजानन विजयकर यांजकडून रु.१००१/-

❁ डॉ. श्री. शशांक श्रीपाद विजयकर यांजकडून त्यांचे सुपुत्र श्री. उद्धव यांच्या एचएससी परीक्षेतील यशाप्रीत्यर्थ रु.१००१/-

❁ श्रीम. सुशीला पांडुरंग खोठारे, सौ. अनिता आणि श्री. सुनील पांडुरंग कोठारे आणि कु. सुनीता कोठारे यांजकडून कै. पांडुरंग कोठारे यांच्या स्मरणार्थ रु.१००१/-

❁ सौ. अचला सुभाष देसाई यांजकडून त्यांच्या साठाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु.१०००/-

❁ श्री. संजय मनोहर देसाई कडून प्रभुतरुणाचे आजीव सदस्य रु. ३५०/-

❁ सौ. प्रतिभा दिलीप नवलकर आणि दिलीप जयवंत नवलकर यांजकडून त्यांची कन्या पायल हिच्या बी.कॉम. परीक्षेतील यशाप्रीत्यर्थ रु.१०१/-

❁ सौ. कविता मनोहर धुरंधर यांजकडून कन्या श्वेता मनोहर धुरंधर यांच्या स्मरणार्थ रु.१०१/-

*

## अभिनंदन

❁ डॉ. सौ. सुरेखा बन्सीधर धुरंधर या 'प्रभुतरुणा'च्या समर्थ कोषाध्यक्षा. श्री. बन्सी यांच्या अतिव्याप्त व्यवसायाला त्यांचा पाठिंबा नेहमीच असतो. स्वत:च्या वैद्यकीय व्यवसायातही त्या कायम निमग्न असतात. 'इनरव्हील' या संस्थेच्या कार्याबरोबरच 'प्रभुतरुण'चा कोष चोख राखणे, वाढवणे आणि त्याचा योग्य कारणांसाठी विनिमय करणे हे त्यांचे मोठे कार्य. 'प्रभुतरुणा'च्या सर्व कार्यात त्यांचा जबाबदारीने सहभाग असतो. येत्या २८ ऑगस्ट २०१२ रोजी त्या वयाची साठी पूर्ण करीत आहेत यावर त्यांच्या उत्साहाकडे, कार्यक्षमतेकडे पाहून विश्वास बसत नाही. आमच्या या कार्यप्रवण चिरतरुण कोषाध्यक्षांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा. सुरेखाताई आजवरच्या आयुष्यासारखेच यापुढेही निरोगी, 'सुरेख' जगा.

❁ श्रीमती चंद्रकला यशवंत व्यवहारकर या सर्व नातेवाईकांत 'माई' म्हणून ओळखल्या जातात. शांत स्वभावाच्या धीरोदात्त माई सर्वांना स्नेहशील आधार देणाऱ्या. कै. रामराव विजयकर यांच्या या ज्येष्ठ कन्या. एकेकाळी सतार वाजवण्याचा छंद असलेल्या. वाचनात आणि शिकविण्यात रमणाऱ्या. पदरी आलेले दु:ख सहनशीलतेने स्वीकारून नेहमीच इतरांचे भले चिंतणाऱ्या. १ ऑगस्ट २०१२ म्हणजेच नारळीपौर्णिमेला वयाची नव्वदी त्यांनी पूर्ण केली. त्यांच्या कुटुंबीयांनी हा नव्वदीचा हृद्य सोहळा वांद्र्याच्या एमआयजी सभागृहात साजरा केला. या साजऱ्या व्यक्तिमत्वाला अभिवादन आणि शुभेच्छा.

❁ दिनांक १७ जुलै २०१२ रोजी डॉ. गजानन वामनराव विजयकर यांनी वयाची अवघी ८९ वर्षे पूर्ण करून नव्वदीत प्रवेश केला. पाठारे प्रभू चॅरिटीझ या संस्थेचे ते सक्रीय विश्वस्त आहेत. या संस्थेसाठी आजवर त्यांनी ४३ वैद्यकीय शिबीरे घेतली आहेत. आपला वैद्यकीय सेवेचा वारसा त्यांनी कुटुंबाला दिला आहे. त्यांचे ज्येष्ठ पुत्र डॉ. प्रफुल्ल यांना नुकताच प्रतिष्ठेचा पुरस्कार लाभला. ४ ऑगस्ट रोजी त्यांनीही वयाची साठी पूर्ण केली. त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा. डॉ. प्रदीप या त्यांच्या चिरंजीवांनी नातू डॉ. तन्मय यांच्या जोडीने एम.डी. केले. नाती डॉ. श्वेताली, डॉ. मिताली, नातू डॉ. अंबरीश असे त्यांचे सगळे घराणेच डॉक्टरांचे. वैद्यकीय सेवा म्हणजे समाजसेवा मानणारे. म्हणूनच डॉ. गजानन विजयकर आजही या सेवेत रत आहेत. त्यांना आदरपूर्वक अभिवादन आणि मन:पूर्वक शुभेच्छा.

❁ कु. अनुष्का आशीष नवलकर हिला एनसीसीतील एकल नृत्यस्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त झाले. इंटर स्कूल ज्युनियर विंग या विभागातूनही तिचा प्रथम क्रमांक आला. अभिनंदन.

❁ निकिता देवेंदर शर्मा ही सतीश



शामराव कोठारे व मीनल सतीश कोठारे यांची नात (आणि ती मनिषा व देवेंदर शर्मा यांची मुलगी.) सांताक्रूझ येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये ती बारावीची विद्यार्थिनी आहे. २०१२ आंरराष्ट्रीय ऑलिम्पियाड इंग्रजीच्या स्पर्धेत निकिताचा दुसरा क्रमांक आला आहे. दिनांक ८ जुलै रोजी यशवंतराव सभागृह, कुलाबा येथे महाराष्ट्र शासनातर्फे निकिता व अन्य यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या स्पर्धेत विविध शाळातून एकूण २२,००० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

गतवर्षी २०११ गणित आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड स्पर्धेत निकिताने तिसरा क्रमांक पटकाविला होता. याशिवाय वेगवेगळ्या वयोगटातून परंतु एकाच राष्ट्रीय निबंधस्पर्धेत पहिले पारितोषिक मिळविण्याचा विक्रमही २०११ मध्ये मनिषा व निकिता या मायलेकींनी केलेला आहे. त्या दोघी उत्तम कवयित्रीही आहेत.

निकिताचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!

(पान ५ कॉलम ४ वरून)

नूतन कीर्तिकरकडून घरी बनवलेला रोठ देण्यात आला. विविध खेळांमध्ये विजेत्या झालेल्यांना विश्वस्तांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली आणि खास करून ८०हून अधिक वय असलेल्या तीन सभासदांना म्हणजे श्री. शरद धुरंधर, श्री. शंकर त्रिलोकेकर आणि श्रीमती लीला राणे यांना समाजातर्फे खास भेटवस्तू देण्यात आल्या. सहलीची वर्गणी सर्वप्रथम भरणाऱ्या श्री. अजित नवलकर यांनाही भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ५ वर्षांखालील सभासद कु. विवान आगासकर व कु, आरूष जयकर यांनाही बक्षीस देण्यात आले.

समाजाचे चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर व सौ. नीता सेंजित, तसेच समाजाचे विश्वस्त श्री. अजित तळपदे आणि सभासद सौ. नूतन कीर्तिकर यांनी खास परिश्रम घेऊन ही वर्षासहल आयोजित केली होती. त्यांचे सर्वांनीच मनापासून कौतुक केले. परतीच्या वाटेवर भजनसिंग दूध डेअरीला भेट देऊन खरेदी करून मंडळी तृप्तमनाने आनंदात घरी परताली. या सहलीत काठीचा सहारा घेऊन श्री. शंकर त्रिलोकेकर, श्री. रंजन धैर्यवान (खास पुण्याहून) आणि श्री. नैषध विजयकर सहभागी झाले होते. यातच यासहलीचे यश सामावले आहे.

सोशल समाजाचा वार्षिक अहवालही घरोघरी प्राप्त झाला. अभिनंदन.

*

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १५-०६-१२ | श्री. अनंतकुमार वामनराव कोठारे | वय ७९ | बोरीवली |
| ०२-०७-१२ | श्रीम. नंदिनी वसंतराव जयकर | वय ८५ | परळ |
| २७-०७-१२ | श्रीम. अर्चना सदाशिव नवलकर | वय ७५ | कळवा |
| ०३-०८-१२ | श्री. शरद मोरेश्वर कोठारे | वय ८२ | अंधेरी |

## परीक्षेतील सुयश

**दहावी**

कु. अदिती दिनार तळपदे ९२%

**बारावी (वाणिज्य)**

श्री.उद्धव शशांक विजयकर, ७२.१७%

**बारावी (सायन्स)**

श्री. सचेत संजय देसाई ८१.५० %

**बॅचलर ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी**

श्री. राहुल रवी कीर्तिकर ६९.९ %

**पोस्टग्रॅज्युएशेन डिप्लोमा इन बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन**

सौ. अश्विनी दीप विजयकर ८०%

**बीएससी**

कु. स्वप्निला अजित जयकर ४४५/८००, द्वितीय श्रेणी

**बी.कॉम.**

श्री. स्वप्नील प्रशांत देसाई

*

॥ श्री इंद्रायणीप्रसन्न ॥ ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

**प्रकाश कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ निर्योजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: साबुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.

फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८